# केईएममध्ये मुकुल माधव फाऊंडेशनतर्फेविशेष कक्ष

**औरंगाबाद :** शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणाऱ्या मुकूल माधव फाऊंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील नवजात अतिदक्षता कक्ष सुरु करण्यात आला. या कक्षाचे नामकरण सोनाली-द लिटल स्टार्स रुम असे करण्यात आले आहे. या कक्षाचे उद्घाटन स्पायका इलास्टिक प्रा.लिमिटेडचे संचालक रजनीकांत जैठा यांची पत्नी आशा जैठ यांच्या हस्ते झाले. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे व मुकूल माधव फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, विश्वस्त रितु छाब्रिया, निर्देशक डॉ.के. जे.कोयाजी, डॉ.ए.एन.पंडित,मनीष व मनीषा जैठा,गायत्री छाब्रिया उपस्थित होत्या.